# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### शैक्षणिक धोरण आराखडा, २०२४ मध्ये शालेय शिक्षण, कला, व्यावसायिक शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आल्याबाबत

**(१) ७९ (२६-०३-२०२५) श्री.विक्रांत पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक धोरण आराखडा, २०२४ मध्ये शालेय शिक्षण, कला, व्यावसायिक शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मनुष्यबळ आणि आर्थिक तरतुदीबाबत उल्लेख नसल्यामुळे या धोरणाच्या यशस्वितेबाबत शिक्षणतज्ज्ञांनी यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये दिनांक ४ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय शैक्षणिक परिषदेमध्ये प्रश्न उपस्थित केला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ व आर्थिक तरतूद पुरविण्याच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, शैक्षणिक धोरण आराखडा, २०२४ मध्ये शालेय शिक्षण, कला, व्यावसायिक शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आल्यानुसार उक्त धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मनुष्यबळ आणि आर्थिक तरतुदीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नवीन शैक्षणिक धोरणामध्ये ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत त्यांच्या पूर्ततेसाठी नवीन शिक्षक भरती करण्याचे विचाराधीन आहे. तसेच शालेय शिक्षण अभ्यासक्रम मसुदा २०२५ संबंधित शिक्षण विकास मंच यांच्या सर्वसाधारण सूचना व विषयनिहाय अभिप्राय संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना प्राप्त आहेत.

(३) व (४) अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांच्या अंतिमिकरणाची प्रक्रिया सुरू असून ती लवकर पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यानंतर नियोजन करण्यात येऊन पुढील शैक्षणिक वर्षापासून याची अंमलबजावणी करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२) ३९२ (२४-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वर्ग एक ते चतुर्थ श्रेणी कर्मचारी अशी एकूण ८६४ पदे मंजूर असून सध्या ३९२ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत या अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठातील ४७२ रिक्त पदे भरण्याबाबत विद्यापीठ अधिसभेत निर्णय घेण्यात आल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषांगाने नागपूर विद्यापीठातील अधिकारी व चतुर्थ श्रेणीतील ४७२ रिक्त पदे भरण्याबाबत विद्यापीठ अधिसभेत घेतलेल्या निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१३-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

नागपूर विद्यापीठात अधिकारी ते चतुर्थ श्रेणी कर्मचारी अशी एकूण १०९२ पदे मंजूर असून त्यापैकी ४५४ पदे कार्यरत आहेत.

(२) विद्यापीठ अधिसभेत असा निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विविध विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापक पदांच्या निवडीसाठी सामायिक प्रवेश परीक्षा घेण्याबाबत

**(३) ५०९ (२४-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या कॉलेजांमधील प्राध्यापक, सहायक प्राध्यापक आणि व्याख्याता इत्यादी पदे भरण्यासाठी पारदर्शक प्रणालीची गरज असून ‘प्राध्यापक पदावरील व्यक्तीची निवड गुणवत्ता आणि कार्यक्षमतेच्या आधारेच व्हावी, यासाठी एखादी सामायिक प्रवेश परीक्षा घ्यायला हवी, अशी भूमिका मा.राज्यपाल यांनी मुंबई विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभामध्ये दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास मांडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने माहीती घेऊन त्याअनुषंगाने प्राध्यापक पदांवरील पदांसाठी सामायिक

प्रवेश परीक्षा घेण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१३-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) मा.कुलपती तथा राज्यपाल महोदय यांच्याकडून प्राप्त निर्देशास अनुसरून राज्यातील सार्वजनिक विद्यापीठामधील अध्यापकांच्या भरती प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी शासन निर्णय दिनांक २८/०२/२०२५ अन्वये कार्यपध्दती विहित करण्यात आली. सदर कार्यपध्दतीत मा.कुलपती तथा राज्यपाल महोदय यांच्या सहमतीने शासन निर्णय दिनांक ०६/१०/२०२५ अन्वये आणखी सुधारणा करण्यात आली असून त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सध्या सुरू आहे.

सद्य:स्थितीत महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक संवर्गाची भरती शासन निर्णय,उच्च व तंत्र शिक्षण दिनांक ८/०३/२०१९,दिनांक १०/०५/२०१९ आणि दिनांक १/०१/२०२४ मधील तरतुदीनुसार करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा / तुकड्या / वर्ग / अतिरिक्त शाखेवर कार्यरत शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वाढीव टप्पा अनुदान देण्याबाबत निधीची तरतूद करण्याबाबत

**(४) ५३५ (२४-०४-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा / तुकड्या / वर्ग / अतिरिक्त शाखेवर कार्यरत शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वाढीव टप्पा निधीसह मंजूर झाला असून माहे जून, २०२४ महिन्यापासून त्याची अंमलबजावणी करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला असून याचा फायदा ४९ हजार ५६२ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना होणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना टप्पा वाढ अनुदान मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित होऊनही अद्याप निधीची तरतूद करण्यात न आल्याने शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या टप्पा वाढ अनुदानबाबत निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१), (२) व (३) मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, राज्यातील खाजगी विनाअनुदानित व अंशत:

अनुदानित शाळांना अनुदानाचा वाढीव टप्पा मंजूर करण्यासंदर्भात यापूर्वी निर्गमित करण्यात आलेला दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजीचा शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २५/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आला आहे.

दिनांक २५/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सध्या टप्पा अनुदान घेत असलेल्या शाळांना २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा व दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी विहीत मुल्यांकनानुसार अनुदानासाठी पात्र ठरलेल्या तथापि, शासन स्तरावर अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना २० टक्के अनुदानासाठी पात्र करुन अनुदान मंजूर करण्यास तसेच टप्पा अनुदानाकरीता एकूण रुपये ९७०.४२ कोटी इतक्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य पदांच्या सुधारित सेवा प्रवेश नियमानुसार पदोन्नती देण्याबाबत

**(५) ५५४ (२४-०४-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे : तारांकित प्रश्न क्रमांक २०१९२ ला दिनांक २७ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आय.टी.आय.) निदेशक संघटनेच्या मागील वीस वर्षांपासूनच्या पाठपुराव्यानंतर प्राचार्य वर्ग २ व वर्ग ३ पदांच्या सुधारित सेवा प्रवेश नियमानुसार पदोन्नती प्रक्रिया राबविण्याचे अधिसूचित झाले असून अद्यापही सुधारित सेवा प्रवेश नियमानुसार पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राचार्य वर्ग २ व वर्ग ३ पदांच्या सुधारित सेवा प्रवेश नियमानुसार पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात आली असल्यास पदोन्नतीचे आदेश निर्गमित झालेले आहेत काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्राचार्य वर्ग २ व वर्ग ३ पदांच्या सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याची कारणे काय आहेत, तसेच सदर प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१८-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पूर्णवेळ शिक्षक, गट-क संवर्गातून पदोन्नतीस पात्र एकूण १८ कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापक, गट-ब (तांत्रिक)(राजपत्रित), महाराष्ट्र शिक्षण सेवा या संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

गट निदेशक, गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी अंतिम करण्याबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्याने सदर संवर्गातून प्राचार्य/उपप्राचार्य /सहायक प्रशिक्षणार्थी सल्लगार, गट-ब (तांत्रिक) (राजपत्रित), महाराष्ट्र शिक्षण सेवा या संवर्गात पदोन्नतीची प्रक्रीया राबविण्यात आलेली नाही.

(२) पूर्णवेळ शिक्षक, गट-क (तांत्रिक) या संवर्गातून मुख्याध्यापक, गट-ब (तांत्रिक)(राजपत्रित), महाराष्ट्र शिक्षण सेवा या संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

तसेच शिल्प निदेशक गट-क या संवर्गातून गट निदेशक, गट-क या पदावर सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(३) मा. प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, खंडपीठ नागपूर येथे श्री.सदानंद विश्वनाथ गावंडे व इतर कर्मचाऱ्यांनी सेवाजेष्ठतेच्या अनुषंगाने दाखल केलेला मूळ अर्ज ५३८/२०२१ याचिकेवर मा.प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिनांक १२/०९/२०२५ रोजी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने प्रसिध्द केलेली गट निदेशक, गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी सुधारित करण्याबाबत अंतिम न्यायनिर्णय दिलेला आहे. यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळपदी उन्नयन करणेबाबत

**(६) ७१४ (२४-०४-२०२५) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे : तारांकित प्रश्न क्रमांक २०१९६ ला दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळेतील सुमारे १११ शिक्षकांचे संच मान्यतेमध्ये पद कमी केल्याने मागील पंचवीस वर्षापासून अविरतपणे कार्यरत असलेल्या तसेच उच्च माध्यमिक शाळेतील सुमारे ७०० अर्धवेळ शिक्षक, पद असेपर्यंत कार्यरत असून पद गेल्यानंतर कोणत्याही प्रकारचे संरक्षण या शिक्षकांना मिळत नसल्याचे माहे, जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च माध्यमिक शाळेतील ७०० शिक्षकांचा कार्यभार वाढत असल्यास किंवा त्याच उच्च माध्यमिक शाळेत रिक्त पदी किंवा दोन उच्च माध्यमिक शाळा मिळून, पूर्णवेळ पदी उन्नयन समावेशन करण्यासाठीचा निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्याकडून माध्यमिक शाळांमधील अर्धवेळ शिक्षकांच्या उन्नयनाबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे हे ही,खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माध्यमिक शिक्षकांना अतिरिक्त करून सेवा संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२६-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासन स्तरावरुन तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठातील सरळसेवेची शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) १४२० (२४-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठास दिनांक २६ एप्रिल, २०१० च्या मंजूर आकृतीबंधानुसार एकूण १३१९ पदे मंजूर असून आजमितीस एकूण ७५७ पदे रिक्त आहेत व त्यातील ५१५ रिक्त पदे ही सरळसेवेने भरली जाणारी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भरतीस शासनाची मान्यता नसल्याने विद्यापीठास ही पदे भरता येत नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांचे निकाल वेळेत जाहीर न होणे, पात्रता व नावनोंदणी वेळेत न होणे इत्यादी विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होत असून जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांच्यावर कामाचा अतिरीक्त भार आल्याने त्यांच्या मानसीक व शारीरिक आरोग्यावर परीणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठाकडुन यापूर्वी पद भरतीसंदर्भात संचालक कार्यालय, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत व मुंबई विद्यापीठातील शिक्षकेतर पदांच्या सरळसेवेच्या पदभरतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१३-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठास दिनांक २६ एप्रिल, २०१० च्या मंजूर आकृतीबंधानुसार एकूण १३१९ पदे मंजूर त्यापैकी ५५५ पदे भरलेली असून ७६४ पदे रिक्त आहेत. त्यातील ५७१ रिक्त पदे ही सरळसेवेने भरली जाणारी आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) रिक्त पदांपैकी अत्यावश्यक शिक्षकेतर पदे भरण्याबबात मान्यता देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुदानापासून वंचित असल्याने शिक्षक आत्महत्या करीत असल्याबाबत

**(८) २४६८ (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संस्थाचालकांच्या जाचाला कंटाळून खाजगी अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आत्महत्या करीत असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना टप्पा वाढ अनुदान मंजूर करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित होऊन देखील अजूनही निधीची तरतूद करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना टप्पा वाढ अनुदान मंजूर करण्याबाबत निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१), (२) व (३) मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, राज्यातील खाजगी विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळांना अनुदानाचा वाढीव टप्पा मंजूर करण्यासंदर्भात यापूर्वी निर्गमित करण्यात आलेला दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजीचा शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २५/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आला आहे.

दिनांक २५/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सध्या टप्पा अनुदान घेत असलेल्या शाळांना २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा व दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी विहीत मुल्यांकनानुसार अनुदानासाठी पात्र ठरलेल्या तथापि, शासन स्तरावर अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना २० टक्के अनुदानासाठी पात्र करुन अनुदान मंजूर करण्यास तसेच टप्पा अनुदानाकरीता एकूण रुपये ९७०.४२ कोटी इतक्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शैक्षणिक सहलीसाठीच्या जाचक अटी रद्द करणेबाबत

**(९) २७१४ (१८-०७-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शैक्षणिक सहलीसाठी शिक्षण विभागाकडून अनेक जाचक अटी घालण्याबरोबरच सहलींची परवानगी देण्यात अधिकारी वर्गात मतभिन्नता असून सहलीची तारीख ठरल्यानंतर शिक्षण विभागाकडून अगदी एक किंवा दोन दिवसाआधी सहलीसाठी परवानगीचे पत्र दिले जात असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सहलीसाठी तीन दिवसांचा तर राज्याबाहेरील सहलीसाठी आठ दिवसांचा मुक्काम असावा अशी मागणी संबंधित शाळांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील शाळांनी सहलीसाठी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-१२-२०२५) :** (१), (२) व (३) शासन निर्णय, दिनांक २०/०५/२०१७ अन्वये, पर्यटन धोरण-२०१६ अंतर्गत शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये राज्यातील सर्व माध्यमाच्या तसेच सर्व मंडळाशी संलग्नित शाळांतील इयत्ता ५ वी ते १० वीतील विद्यार्थ्यांना ऐतिहासिक विषयाचे ज्ञान मिळावे, भौगोलिक, सांस्कृतिक व शैक्षणिक गोष्टी प्रत्यक्ष पाहण्यास मिळाव्यात व त्यांची माहिती मिळावी यासाठी एका शैक्षणिक वर्षामध्ये एका शैक्षणिक सहलीचे अथवा ग्रामीण पर्यटनाचे (Educational Tour/Rural

Tourism) आयोजन करण्यास मान्यता प्रदान करण्यास परवानगी दिलेली आहे. तसेच, सहलीच्या आयोजनासाठी विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारची सक्ती करण्यात येऊ नये व सहलीमध्ये सहभागी होण्याकरीता संबंधित पालक व विद्यार्थ्यांची संमती असणे आवश्यक राहील असे देखील सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आलेले आहे.

सहलीची तारीख ठरल्यानंतर शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून एक किंवा दोन दिवसाआधी सहलीसाठी परवानगी देण्यात आल्याची बाब किंवा कोणतीही तक्रार निदर्शनास आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी पूर्व प्राथमिक शाळेची नोंदणी करण्याच्या निर्णयाबाबत

**(१०) २९०० (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी पूर्व प्राथमिक शाळांची नोंदणी करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०२५ मध्ये घेतला असून आतापर्यंत एकूण किती पूर्व प्राथमिक शाळांची नोंदणी झाली आहे,
(२) असल्यास, उक्त शाळांपैकी किती शाळा शासनाच्या निकषात बसत आहेत तसेच ज्या शाळा शासनाच्या निकषात बसत नाहीत त्या शाळांच्या व्यवस्थापनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-१२-२०२५) :** (१) वय वर्षे ३ ते ६ वयोगटातील बालकाांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी education.maharashtra.gov.in या शालेय शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावरील Pre-School Registration Portal वर करणे दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बंधनकारक करण्यात आले असून, आतापर्यंत राज्यातील एकूण १२, ४८९ इतक्या पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांची नोंदणी झालेली आहे.
(२) पूर्व बाल्यावस्थेंतर्गत संगोपन व शिक्षण कायदा, २०२५ (Early Childhood Care and Education Act, २०२५) बनविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू असून, बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी केंद्रांना लागू असलेले निकष त्यास अनुसरून निश्चित करण्यात येतील.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकीत देयके निकाली काढण्याबाबत

**(११) २९४९ (१८-०७-२०२५) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली थकीत देयके निकाली काढण्यात आली असून संचालक स्तरावरून मंजुरी मिळूनही तांत्रिक कारणामुळे मुख्याध्यापक लॉगीन वरून सादर न झालेले व संचालक स्तरावरही अनेक देयके अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देयके निकाली काढण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२०-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील खाजगी अनुदानित शाळामधील येता शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करणेबाबत शासन निर्णय दिनांक १५ जुलै २०१७ अन्वये सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सन २०२४-२५ पासून थकीत वेतन देयक ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यात येत असून, एकूण प्राप्त ६६८१ ऑनलाईन देयकांपैकी रक्कम रुपये १,०१,५७,८१,०००/- इतक्या रकमेची ४२६८ देयके मंजूर करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात केंद्रीय विद्यालय सुरू करण्याबाबत

**(१२) २९५२ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील पाच वर्षात केंद्रीय विद्यालय संघटनेने (केव्हीएस) नागरी, संरक्षण, उच्चशिक्षण संस्था, प्रकल्प क्षेत्रांतर्गत देशात तब्बल ६० नवीन केंद्रीय विद्यालये सुरू केली असून त्यापैकी राज्यात एकही केंद्रीय विद्यालय सुरू करण्यात आलेले नसल्याने महाराष्ट्रात नवीन केंद्रीय विद्यालय सुरू करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केला असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास केंद्र शासनाची मंजुरी मिळण्याबाबत शासनाने पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.दादाजी भुसे (१९-०१-२०२५) :** (१) केंद्रीय विद्यालय संघटनेने (केव्हीएस) देशभरात नवीन केंद्रीय विद्यालय सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. यामध्ये राज्यातील ३ केंद्रीय विद्यालय अकोला, रत्नागिरी व गडचिरोली यांच्या समावेश असून सदर ठिकाणी शाळा सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केंद्रीय विद्यालय संघटनेने राज्यात सुरु करण्यास मान्यता दिलेल्या जिल्ह्यात नवीन केंद्रीय विद्यालय कार्यान्वित करण्याकरीता योग्य व पुरेशी कायमस्वरुपी मोफत जमीन केंद्रीय विद्यालय संघटणाला हस्तांतर करणेबाबत तसेच कायमस्वरुपी इमारत बांधेपर्यंत तात्पुरती निवास व्यवस्था करुन देणेबाबत जिल्हाधिकारी स्तरावर कार्यावाही सुरु आहे.

---

## राज्यात शाळांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करुन “हेल्थ कार्ड” व सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास मंजूरी दिल्याबाबत

**(१३) ३०६७ (१८-०७-२०२५) श्री.सचिन अहिर, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना वैद्यकिय तपासणी करुन ''हेल्थ कार्ड'' देण्याची आणि सर्व शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याची योजना शासनातर्फे करण्याच्या निर्णयास मंजूरी देण्यात आली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन्ही योजनांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर योजनांची अंमलबजावणी किती कालावधीत करण्यात येणार आहे ?

**श्री.दादाजी भुसे (१८-१२-२०२५) :** (१), (२) व (३) हेल्थ कार्ड बाबत : -

शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणी बाबतच्या दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांच्यासोबत दिनांक १०/०३/२०२५ रोजी बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणी बाबत बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये पुढील विषयांबाबत चर्चा झाली -
i) शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी कार्यक्रम
ii) आरोग्य तपासणी कार्यक्रमाचे ऑनलाईन ॲप
iii) शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य पत्रिका म्हणजेच हेल्थ कार्ड

तसेच, सदर बैठकीमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागास ऑनलाईन ॲप तयार करून त्या मार्फत सर्व विद्यार्थ्यांचे हेल्थ कार्ड तयार करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार, आकांक्षित चार जिल्हे (नंदुरबार, गडचिरोली, उस्मानाबाद, वाशिम) आणि राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम राबविण्यात येणारे पाच जिल्हे (धुळे, जळगाव, औरंगाबाद, नांदेड व बीड) हे एकूण नऊ जिल्हे वगळता उर्वरित जिल्ह्यांमध्ये जिल्हा व तालुकास्तरावर या प्रकरणी समिती गठीत करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. या समित्यांची रचना तसेच कार्य याबाबत सदर शासन निर्णयात माहिती देण्यात आलेली आहे.

सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत: -

शासन निर्णय, दिनांक १३ मे, २०२५ अन्वये, राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत (प्रत संलग्न). सदर शासन निर्णयात सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत पुढील सूचना देण्यात आलेल्या आहेत : -

खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांकरीता शाळा व परिसरातील मोक्याच्या ठिकाणी पर्याप्त संख्येने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक राहील. सदर कॅमेरे नियमितपणे कार्यरत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापनाची असेल. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेली नाहीत अशा शाळांन कॅमेरे बसविण्याकरीता जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना (DPC) अंतर्गत शालेय शिक्षण विभागाशी संबंधित योजनांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ५ टक्के निधीचा वापर करता येईल असे नमूद करण्यात आले आहे. तसेच जिल्हास्तरावर उपलब्ध असणारे निधी, जसे की, खनिज निधी, विधिमंडळ व संसद सदस्य निधी, जिल्हा परिषदेमधील विकास कामाचे विविध निधी, इत्यादी निधी शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याकरीता वापरता येऊ शकतात. केवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे पुरेसे नसून ठराविक अंतराने त्यांचे फुटेज देखील तपासणी

आवश्यक असून, असे फुटेज तपासण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीची असेल.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशांनुसार, विद्यार्थी सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या १३ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील सुरक्षा उपाययोजनांबाबतची माहिती अपलोड करण्यासाठी शाळांसाठी एक पोर्टल विकसित करण्यात आले आहे. हे पोर्टल https://education.maharashtra.gov.in/school/users/studentSecurityPublic या वेबलिंकद्वारे सर्व सामान्य नागरिकांसाठी खुले आहे.

---

## राज्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत मुख्याधापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) ३४१५ (२८-०५-२०२०) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत हजारो मुख्याधापकांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या अधिनस्त जिल्हा परिषद माध्यमिक शाळांसाठी ३५६ मुख्याध्यापकांची राजपत्रित दर्जाची पदे मंजूर असून मुख्याध्यापकांची (राजपत्रित) पदे मुख्याध्यापक (अराजपत्रित) पदांमध्ये रुपांतरित करुन जिल्हा परिषदेकडे वर्ग करुन सदर पदांवर अनुभवी व जेष्ठ शिक्षकांना पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन वित्त विभागाच्या मान्यतेनंतर सदर पदे भरण्यासाठी ग्रामविकास विभागाकडे वर्ग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१९-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) मुख्याध्यापक (राजपत्रित) ही पदे शालेय शिक्षण विभागाच्या आकृतीबंधामध्ये कायम ठेवण्यात येणार आहेत. सदर पदांचा समावेश सक्षमीकरण शाखेमध्ये करण्याचे प्रस्तावित असून, त्याबाबतचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## छत्रपती संभाजी महाराजांच्या गौरवशाली इतिहासाचा समावेश पाठयपुस्तकांमध्ये करण्याबाबत

**(१५) ३४९४ (१८-०७-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजी महाराजांच्या गौरवशाली इतिहासाची माहिती येणाऱ्या पिढीला व्हावी, यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ मार्च २०२५ रोजी किंवा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे शालेय शिक्षणातील पाठ्यपुस्तकांमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास अंतर्भूत करण्याबाबत विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजी महाराजांच्या आत्मबलिदानास दिनांक ११ मार्च २०२५ रोजी ३३६ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महाराजांचा साहसी, पराक्रमी, सुसंस्कृत व स्वातंत्र्यप्रिय इतिहास, संस्कृतसह इतर भाषेतील त्यांची ग्रंथसंपदा, १४० विजयी लढाया आणि असा दैदिप्यमान इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सद्य:स्थितीत, प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ मध्ये, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांच्या वतीने प्रकाशित इयत्ता ७ वी च्या इतिहास विषयाच्या पुस्तकामध्ये मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम या पाठ क्रमांक ९ मध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याविषयी माहिती दिलेली आहे.

तसेच, राज्य अभ्यासक्रम आराखडा-शालेय शिक्षण हा नोव्हेंबर, २०२४ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्यामधील अभ्यासक्रमाची ध्येये व क्षमतेनुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने विकसित करण्यात येत असलेल्या नवीन अभ्यासक्रमानुसार, पूर्व माध्यमिक स्तर (इयत्ता ७वी) अभ्यासक्रमाचे ध्येय हे शिवपूर्वकालीन महाराष्ट्र, हिंदवी स्वराज्य स्थापना, मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम, व मराठी सत्तेचा विस्तार याविषयी माहिती देणे असे आहे. याअंतर्गत अभ्यासक्रमामध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाचा समावेश करण्यात आला असून, पाठ्यपुस्तक बनवताना देखील छत्रपती संभाजी महाराजांच्या महान कार्याचा सर्वांगीण समावेश होण्याची काळजी घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दादर (जि.मुंबई) येथील साने गुरुजी इंग्रजी प्राथमिक शाळा व्यवस्थापनाने मनमानी पध्दतीने २६ टक्के फी वाढ केली असल्याबाबत

**(१६) ४२६७ (१८-०७-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दादर येथील साने गुरुजी इंग्रजी प्राथमिक शाळेमधील पालक-शिक्षक समितीची मान्यता न घेता शाळा व्यवस्थापनाने २६ टक्के फी वाढ केली असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रक्रिया पारदर्शीपणे राबविली गेली नसल्याबाबतची तक्रार पालक-शिक्षक समितीकडून दिनांक १७ एप्रिल,२०२५ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासन स्तरावर चौकशी करुन कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२३-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग यांनी संबंधित शाळा व्यवस्थापनाने सन २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये कोणतीही शुल्क वाढ केली नसल्याबाबत लेखी खुलासा दिलेला आहे. शाळेने कोणतीही फी वाढ केलेली नसल्यामुळे सदरहू शाळा व्यवस्थापनावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात स्वतंत्र अत्याधुनिक हवामान अंदाज प्रणाली विकसित करण्याबाबत

**(१७) ४५४२ (१८-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात हवामन अंदाज प्रणालीतील अचूकतेच्या अभावामुळे आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेवर गंभीर परिणाम होत असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरटीआयच्या माहितीनुसार मुंबईसह महाराष्ट्रात जुलै,२०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या घटनेत IMD ने केवळ यलो अलर्ट जारी केला होता, परंतु तीन तासांत मुंबईत प्रचंड पाऊस कोसळला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हवामान अंदाज प्रणालीतील या त्रुटीं दूर करुन स्वतंत्र अत्याधुनिक हवामान अंदाज प्रणाली विकसित करण्याबाबत व आपत्तींमुळे जीवित व वित्तीय नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

IMD ने दिनांक ०६/०७/२०२४ रोजी दिलेल्या हवामान अंदाजानुसार दिनांक ०७/०७/२०२४ रोजी मुंबई शहर आणि उपनगर या जिल्ह्यांसाठी ग्रीन अलर्ट २४ तासात दिला होता आणि त्या दिवशी कुलाबा येथे ८३.८ मी.मी. व सांताक्रुझ येथे २६७.९ मी.मी. एवढ्या पावसाची नोंद झाली आहे.

परंतु राज्यात उर्वरित जिल्ह्यांच्या अनुषंगाने हे खरे नाही.

(३) राज्य शासनाने दिनांक ०८/०४/२०२५ रोजी अत्याधुनिक आणि अद्ययावत अशा राज्य आपत्कालीन कार्य केंद्राची स्थापना केली आहे.

सदर विभागाकडून महावेध पोर्टल तसेच IMD (Indian Metrological Department) यांचे API (Advance Programming Interface) यांचे एकत्रीकरण करण्याची कार्यवाही सुरु आहे. हवामान अंदाज प्रणालीतील त्रुटीं दुर करण्याच्या अनुषंगाने महावेध कडून Real Time Data घेण्याची कार्यवाही चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील केंद्र प्रमुखांना सेवा जेष्ठतेनुसार वरिष्ठ पदाचा लाभ मिळण्याबाबत

**(१८) ५५४० (२०-११-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्रीय प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याच्या उद्दिष्टाने केंद्रीय प्राथमिक शाळांची निर्मिती झाली असून राज्यातील २२०५ मराठी आणि उर्दु केंद्रांना केंद्र प्रमुखच नाहीत तसेच राज्यातील प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करून १४००-२६०० अधिक १२५ विशेष वेतन या वेतनश्रेणीत केंद्र प्रमुखाची ४८६० पदे भरण्यात आली होती त्यात विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शिक्षक यांच्याप्रमाणे केंद्र प्रमुख सेवा जेष्ठतेनुसार वरिष्ठ पदापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात पुर्वीप्रमाणे शिक्षण विस्तार अधिकारी जिल्हा परिषद सेवा प्रवेश सन १९६७ मध्ये ७५ टक्के सरळसेवा व २५ टक्के सेवाजेष्ठ शिक्षकांमधून पदोन्नतीने भरले जाऊन केंद्र प्रमुखांची पदे देखील बीएड पात्रता धारण केलेल्या सेवाजेष्ठ शिक्षकांमधून भरली जात होती, सन २०१४ मध्ये तत्कालीन शासनाने शिक्षण विस्तार अधिकारी पदे भरताना ५० टक्के सरळसेवा, २५ टक्के विभागीय स्पर्धा व २५ टक्के पदोन्नतीने तसेच केंद्रप्रमुख भरतीसाठी ४० टक्के सरळसेवा, ३० टक्के विभागीय स्पर्धा परीक्षा व ३० टक्के सेवाजेष्ठतानुसार नविन धोरण आणले असतानाही या धोरणाची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४ नंतर राज्यात सरळ सेवा परीक्षा अथवा विभागीय स्पर्धा परीक्षा घेऊन राज्यातील एकाही जिल्ह्यात शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुखांची पदे भरली गेली नसल्याचे व ३३ जिल्ह्यातील केंद्र प्रमुखांची २ हजार २०५ पदे रिक्त असल्याचे दिनांक ४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सोलापूर जिल्हात १३९ केंद्र प्रमुखांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात स्थापन असलेल्या ४ हजार ८६ केंद्रीय शाळांपैकी केंद्र प्रमुखांची ४६.९६ टक्के पदे रिक्त असून केंद्र प्रमुखाकडे दोन ते तीन केंद्राचा पदभार असल्यामुळे केंद्र प्रमुखाच्या नियुक्तीबाबत शिक्षण संचालकांनी अप्पर मुख्य सचिव यांना पत्र दिले असून केंद्रप्रमुख हे पद जिल्हा तांत्रिक सेवा ‘‘क’’ मध्ये समाविष्ट करण्याबाबत औरंगाबाद खंडपीठाने सहा महिन्यापूर्वी शासनाला आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यातील १९७९४ शाळांपैकी केंद्रीय शाळांची संख्या १२८ असून केंद्रप्रमुखांची ७० हुन अधिक पदे तसेच शिक्षण विस्तार अधिकारी यांची २० पदे रिक्त असल्याने राज्य शासनाने सन २०१४ साली भरतीबाबत प्रसिध्द केलेली अधिसूचना रद्द करावी अथवा तिची अंमलबजावणी करावी अन्यथा शिक्षकांमधून सेवाजेष्ठतेनुसार केंद्र प्रमुख पद व शिक्षण विस्तार अधिकारी यांची रिक्त पदे भरावीत अशी मागणी आदर्श शिक्षक समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद, शिक्षण आयुक्त, पुणे व प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचेकडे केली असल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यात शालेय शिक्षण विभागांतर्गत केंद्र प्रमुखांच्या एकूण ७० टक्के जागा रिक्त असल्याने त्याचा शालेय गुणवत्तेवर व कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत असून या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर केंद्र प्रमुखाचे रिक्त पद पदोन्नतीने भरण्यासाठी तसेच केंद्र प्रमुख हे पद जिल्हा

तांत्रिक सेवा “क” मध्ये समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२०-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

(५) केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांची पदे भरणेबाबतची मागणी शासनाकडे होत आहे. केंद्र प्रमुखांची मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे रिक्त पदे भरण्याकरीता जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. शिक्षण विस्तार अधिकारी यांची मर्यादित स्पर्धा परीक्षेकरीता ९ पदे रिक्त आहेत.

(६) केंद्रप्रमुख पदे ही जिल्हा सेवेतील पदे असून, केंद्रप्रमुख पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

---

## नागपूर शहरातील कौशल्य विकासाधारित अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या नियमात सन २०१७ पासून बदल केल्याने शासनाकडून निधी मिळत नसल्याबाबत

**(१९) ५७५९ (१७-१२-२०२५) श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौशल्य विकासाच्या आधारे युवा वर्गाला स्वंयरोजगार करता यावा यासाठी केंद्र व राज्य शासनाने सुमारे ५०० अभ्यासक्रम सुरु करुन त्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण संस्थांची सन २०१० पासून नेमणूक केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरातील कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या नियमात शासनाने २०१७ पासून बदल केल्याने अनेक संस्था बंद पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमईएस योजनेत सन् २०१२-१३ पासून संस्थांनी भरलेले परीक्षा शुल्काचे अद्याप निराकरण झाले नाही, तसेच सन २०१७-१९ या कालावधी मधील प्लेसमेंट बिलांची चौकशी सन् २०२२ मध्ये होवूनही थकित रक्कम न मिळात्याने अनेक संस्था बंद पडू शकतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरातील किती प्रशिक्षण संस्थांची रक्कम थकित आहे, आणि याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०२-२०२६) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सन २०१७-१९ या कालावधी मधील पात्र प्लेसमेंटची देयके संबंधित मुल्यमापन संस्थांना देण्यात आली आहेत. सद्यस्थित कोणत्याही पात्र प्रशिक्षण संस्थांची रक्कम थकीत नाही. सदरची योजना केंद्र शासनाने बंद केली आहे.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संच मान्यतेमधील त्रुटींची पुर्तता करुन अनुदान देण्याबाबत

**(२०) २३०७० (२२-०७-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक २१०६१ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक व माध्यमिक संच मान्यता दुरुस्ती प्रस्ताव अनेक दिवसांपासून पुणे येथे संचालक स्तरावर प्रलंबित असल्यामुळे कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे, एप्रिल २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार प्राथमिक व माध्यमिक संच मान्यता दुरुस्ती प्रस्ताव निकाली काढण्याचे अधिकार विभाग स्तरावर उपसंचालक यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१२-१२-२०२५) :** (१) व (२) शासन पत्र दिनांक २१/०२/२०२५ अन्वये शाळा निहाय सन २०१३-१४ ते सन २०२३-२४ या मधील महत्तम पदे व सन २०२४-२५ मधील विद्यार्थी संख्येच्या आधारे मान्य होणारी पदे यापैकी जी पदसंख्या कमी असेल ती पदे सन २०२४-२५ च्या संचमान्यतेमध्ये अनुज्ञेय करुन सन २०२४-२५ च्या संचमान्यता करण्याबाबत निर्देश आयुक्त (शिक्षण), पुणे यांना देण्यात आले आहेत. सदर निर्देश व शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ अन्वये निर्गमित सुधारित संच मान्यता निकषानुसार सन २०२४-२५ च्या संच मान्यतेन्वये आधार वैध विद्यार्थी संख्येनुसार संच मान्यता दुरुस्तीचे प्रस्ताव संचालनालय स्तरावर वेळोवेळी निकाली काढण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.